# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१८ / आषाढ २९, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी व फलोत्पादन मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### राज्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(१) * **४१९२५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रविंद्र फाटक, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत पाटील, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच जिल्ह्यात माहे फेब्रुवारी व एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान वादळीवारा, गारपीट, अवकाळी पावसामुळे घरे, विजेचे खांब, शाळा, समाज मंदिरे तसेच जिरायती व बागायती पिकांचे, भाजीपिकांचे, फळपिकांचे व पशुधनाचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल महिन्यात झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे नांदेड, परभणी, लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यात २१३.६० हेक्टर कोरडवाहू, ६१५.५५ हेक्टर बागायत तर ३७१.१० हेक्टर फळपिकांचे असे एकूण १२००.२५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून त्यापैकी ९४६.७५ हेक्टर पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाले असल्याचे पंचनामे करून प्राथमिक अहवाल महसूल प्रशासनाने शासनाला पाठविला असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे फेब्रुवारीमध्ये झालेल्या वादळीवारा, गारपीट, अवकाळी पावसामुळे अकोला जिल्ह्यातील कोरडवाहू ८५०.७० तर बागायतीचे ४६३.७२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाड (जि.रायगड) तालुक्यातील ११ गावांतील ३०४ नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामे महसूल विभागामार्फत करण्यात आलेले असून रुपये १६ लाख ४५ हजार ३७० इतक्या रकमेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शेती पिकांचे व पशुधनाचे किती नुकसान झाले आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) माहे फेब्रुवारी, २०१८ व माहे एप्रिल, २०१८ मध्ये झालेल्या वादळीवारा, गारपीट व अवकाळी पावसामुळे राज्यातील काही जिल्ह्यांतील मालमत्तेचे, शेतीपिके/फळपिके व पशुधनांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) माहे एप्रिल, २०१८ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे नांदेड, परभणी, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील १५६.०० हेक्टर जिरायत पिकांचे, ७०३.४२ हेक्टर बागायत पिकांचे व ९८६.३२ हेक्टर फळपिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालावरुन निदर्शनास आले आहे.

(३) होय, हे खर आहे.

(४) रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यामध्ये माहे एप्रिल व मे, २०१८ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे सुमारे रुपये ३९,४२,७६५ इतके नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(५) राज्यात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये झालेल्या गारपीट व अवेळी पावसामुळे शेतीपिके व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी आपदग्रस्तांना शासन निर्णय दिनांक ३ मार्च, २०१८ अन्वये रुपये ३१३५८.६३ लक्ष एवढा मदतनिधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच राज्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये गारपीटीमुळे व माहे मे, २०१८ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन नुकसानीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतचा सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अनुक्रमे शासन पत्र दिनांक १८/०४/२०१८ व दिनांक १९/०६/२०१८ अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर असून यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहोळ (जि.सोलापूर) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२) * ४१९६९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) येथील बसस्थानक विस्तारीकरण करताना आवारातील बुजविलेल्या विहिरीचा मध्यभाग खचल्याने प्रवाशांच्या जीवाला

धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विहिर बसस्थानकाच्या मध्यभागी असल्याने रात्री अपुऱ्या प्रकाशात अपघात होण्याची शक्यता, दारुड्याची उठबस, लांबपल्ल्याच्या गाड्या नोंद न करता बाहेरच थांबल्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय याकडे येथील प्रशासन दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मोहोळ येथे रा.प. महामंडळाचे नविन बसस्थानक सन २०१४ मध्ये बांधण्यात आलेले आहे.

बसस्थानकाच्या मध्यभागी बुजवलेली विहिर नसून बाहेर जाण्याच्या मार्गावर आहे. सदर बुजविलेल्या विहिरीच्या ठिकाणी पडलेला खड्डा खडी भरून मुरूमाने भरून घेण्यात आला आहे. पोलीस गस्त पथकामार्फत दारुड्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. सदर ठिकाणी पुरेशी लाईट व्यवस्था असून सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत कंट्रोलर यांच्याद्वारा लांबपल्याच्या गाड्या नोंद करुनच मार्गस्थ करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## वाहतूक निरीक्षक पदावर बोगस उमेदवारांची नियुक्ती केल्याबाबत

**(३) * ४२२८४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक पदासाठी १२४ उमेदवारांच्या शिफारशी करण्यात आल्या असून माजी सैनिकांसाठी असलेल्या राखीव गटामध्ये निवड केलेल्या १० उमेदवारांचे वय २३-२४ वर्षे इतकेच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया कमी काळात सैन्यात भरती होऊन निवृत्ती घेतल्याचे अपवादात्मक उदाहरण असू शकत होते मात्र ८ ते १० उमेदवार असे आढळल्यामुळे सदर भरतीत गैरव्यवहार झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्यात आलेल्या वाहतूक निरीक्षक पदावर माजी सैनिकांच्या जागी बोगस उमेदवार नियुक्त केल्याची तक्रार करुन सदर भरतीची राज्य गुन्हे अन्वेषण (सीआयडी) विभागाकडून चौकशी करण्याबाबतची मागणी परिक्षार्थी उमेदवारांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहायक मोटार वाहन निरिक्षक परिक्षा, २०१७ मध्ये प्राथमिक निवड झालेल्या व कागदपत्र तपासणीच्या अधिन राहून ८२१ उमेदवारांची निवड केली असून त्यापैकी ५६ उमेदवार माजी सैनिक प्रवर्गातील आहे. सदर उमेदवाराच्या अर्जांची व कागदपत्रांची तपशिलवार छाननी अद्याप बाकी आहे. नेमणूक करण्यापुर्वी माजी सैनिक प्रवर्गाच्या व वयाच्या दाव्यासह शैक्षणिक अर्हता, अनुभव, आरक्षण, प्रवर्ग अशा सर्वच दाव्यांची सत्यता पडताळून खात्री झाल्यानंतर त्यांना नियुक्ती आदेश देणे अपेक्षित आहे.

सदर कागदपत्रांची छाननी पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी परिक्षार्थी उमेदवारांनी दिनांक १६/०४/२०१८ रोजी परिवहन आयुक्त यांचेकडे निवेदन केले आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक १२/०६/२०१८ च्या आदेशान्वये सदर भरती प्रक्रीयेस status quo जारी केल्याने सद्य:स्थितीत उमेदवारांची कागदपत्र छाननी प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) कृषी विद्यापीठामध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * ४२०६७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) कृषी विद्यापीठाच्या वाकवली संशोधन प्रक्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरेशा वर्गखोल्या नसणे, महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छता गृह नसणे, अशा विविध मुलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वाधिक मोठी अंबाबाग असलेल्या संशोधन प्रक्षेत्रातील विभागामध्ये लावण्यात आलेला डिजिटल डिस्प्ले स्क्रीन मागील दोन वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दापोली येथे गेली अनेक वर्षे सुरु असलेले होर्टीकल्चर महाविद्यालय सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुळदे येथे स्थलांतरित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विद्यापीठामध्ये अद्यावत सुविधा व आधुनिकीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथील कोणत्याही विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांसाठी कोणतेही वर्ग घेण्यात येत नाहीत. त्यामुळे पुरेशा वर्गखोल्या उभारण्याची सध्या आवश्यकता नाही. मध्यवर्ती संशोधन केंद्रांतर्गत सहा विभाग कार्यरत असून त्या अंतर्गत

महिलांसाठी व पुरुषांसाठी एकूण १२ स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. तसेच वाकवली येथील मध्यवर्ती संशोधन केंद्रावर आणखी स्वच्छतागृहे उभारण्यासाठी महिला व पुरुष कर्मचाऱ्यांकरीता तयार शौचालय व सेप्टीक टँक खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथे डिजिटल डीस्प्ले स्क्रीन बसविण्यात आलेला नाही. अथवा खरेदी करण्यात आलेला नाही.
(३) भारतीय कृषी संशोधन परिषदेकडून विद्यापीठाला अधिस्विकृती (Accreditation) देताना घातलेल्या अटीचे पालन करुन उद्यानविद्या महाविद्यालय, सिंधुदुर्ग हे मुळदे येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.
(४) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत कार्यान्वित असलेल्या कार्यक्रमांतर्गत योजनांसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पावसाळी अधिवेशनामध्ये रुपये ११.०० कोटीची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाकरीता संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(५) * ४१७३९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गासाठी शासनाने सक्तीने भूसंपादन करण्याचा निर्णय घेतला असून अध्यादेशाच्या माध्यमातून भूसंपादन कायद्यात बदल करत शेतकरी आणि आदिवासींच्या जमिनी सक्तीने संपादित करण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गासाठी शहापूर तालुक्यातील तीन हजार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणार आहेत, तसेच, उक्त समृध्दी महामार्गाच्या अन्यायकारक सक्तीने भूसंपादनाच्या निर्णयाला ठाणे, शहापूर, अहमदनगर आणि नाशिक भागातील शेतकरी व आदिवासी शेतकरी यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावे यातून जाणाऱ्या ७०० किलोमीटर लांबीच्या व सुमारे रुपये ४६००० कोटी खर्चाच्या द्रुतगती मार्गाच्या १३ पॅकेजसच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी १८ कंपन्यांच्या निविदा पात्र ठरल्या असून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त द्रुतगती महामार्गासाठी एकूण किती जमीन लागणार आहे व त्यापैकी किती जमीन संपादन करण्यात आलेली आहे, सक्तीने सुरु असलेल्या जमिनीचा भूसंपादनाचा मोबदला कमी दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१)

१) महाराष्ट्र समृध्दी महामार्गासाठी जमीन मालकांच्या ऐच्छिक सहमतीने खरेदी खताद्वारे जमीन खरेदी करण्यात आल्या आहेत. मात्र शिल्लक १९% जागेबाबत जमीन एकत्रिकरण योजनेतील दोष, सहहिस्सेदारांची संमती नसणे, मोबदला संविभाजन इ. बाबी असल्याने अशा खाजगी जमिनी थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेता येत नाहीत. सबब अशा खाजगी जमिनीच्या संपादनाबाबत महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (२) प्रमाणे संपादनाचा उद्देश जाहिर करण्याबाबत शासनाने अधिसूचना दिनांक २५/०५/२०१८ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केल्या आहेत.

२) महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १९-ब च्या पोट-कलम (२) अन्वये सदर संपादनासाठी संमतीद्वारे संमती निवाडा/करारनामा याद्वारे संपादित जमिनीचा मोबदला निश्चित करता येतो व उर्वरित प्रकरणामध्ये पोट-कलम (३) अन्वये संपादनाचा निवाडा करण्याची तरतूद आहे.

३) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ हा दिनांक २६/०४/२०१८ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम १०५-क नुसार पाचव्या अनुसूचीमध्ये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचा समावेश करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) या प्रकल्पासाठी एकूण १६ कन्स्ट्रकशन पॅकेज करण्यात आलेले आहेत व त्यापैकी पॅकेज १ ते १३ साठी अर्हताप्रक्रिया (RFQ) तसेच निविदा प्रक्रिया (RFP) पूर्ण झालेली आहे. अहर्ताप्राप्त १८ अर्जदारांकडून निविदा (RFP) बोलाविण्यात आल्या. सदर प्राप्त न्यूनतम निविदाकारांच्या नियुक्तीला मान्यता देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) द्रुतगती मार्गाच्या आखणीमध्ये ८६३६ हे. आर जमीन समाविष्ट आहे. त्यामध्ये ७२९१ हे.आर. खाजगी जमीन आणि १३४५ हे. आर शासकीय जमीन व वन जमीन आहे.

खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने जमीन मालकांच्या ऐच्छिक संमतीद्वारे खाजगी जमिनीपैकी ५९०६ हे. आर (८१%) खाजगी जमीन खरेदी करण्यात आली आहे व “मोबदला निश्चितीसाठीच्या जिल्हास्तरीय समिती” ने निर्धारित केलेली भरपाईची रक्कम विविध पध्दतीने जमीन धारकास अदा करण्यात येत आहे.

(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे पर्याप्त व योग्य मोबदला अदा करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर परिवहन कार्यालयांतर्गत ऑनलाईन परिक्षेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ४२५४२ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर परिवहन कार्यालयांतर्गत ऑनलाईन परिक्षेत गैरव्यवहार करून एका महिन्यात सात हजार शिकावू वाहन परवाने वाटप केल्याचे दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत युवा सेना कार्यकर्ते यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवदेन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) या प्रकरणी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली आहे.

(२) होय.

(३) यासंदर्भात संबंधित सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच प्रकरणाची अधिक चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * ४१६२१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९९७४ ला दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.इंदर नागरे, रा.संगमजळगाव (ता.गेवराई, जि.बीड) यांनी राज्य निवडणूक आयोगाला दिलेल्या तक्रारीची शहानिशा करणेबाबत आयोगाने दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना कळविल्यानंतर गेवराई (जि.बीड) तालुक्यातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अनियमितता केल्याबाबत चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, बीड यांनी केलेल्या चौकशीमध्ये अनेक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर उक्त प्रकरणी तत्कालिन तहसिलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागीय चौकशी कधी पूर्ण होणार आहे, चौकशी अधिकारी यांची नियुक्ती, आरोपपत्र बजावणे इ.बाबी कधी पूर्ण झाल्या आहेत, विभागीय चौकशी पूर्ण झाली असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत, उक्त गैरव्यवहारात चार चाकी वाहन भाडेतत्वावर घेऊन त्यांना डिझेल वाटप केल्याचे कागदोपत्री दाखविताना अशी वाहने अस्तित्वात नसून दुचाकी वाहनाचे बनावट क्रमांक टाकून लाखोंची देयके अदा करण्यात आली असल्याची बाब आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालिन नायब तहसिलदार आणि वाहन विभाग प्रमुख श्री.काळे यांनी या प्रकरणात आपला काही संबध नसून तत्कालिन तहसिलदार यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून हा गैरव्यवहार केला असल्याचे विभागीय आयुक्त यांना लेखी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) श्री.इंदर नागरे, रा.संगमजळगाव ता.गेवराई, जि.बीड यांनी मा.राज्य निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारीची शहानिशा करण्याबाबत मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी बीड यांना कळविले होते. तद्नुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर तक्रारीची चौकशी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी, बीड यांना निर्देशित केले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी बीड यांनी केलेल्या चौकशीमध्ये सकृतदर्शनी काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अनियमिततांच्या अनुषंगाने संबधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २३/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ११/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये संबधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रुटीपूर्तता अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक २२/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला अहवालास अनुलक्षून तत्कालिन तहसिलदार गेवराई, जि.बीड आणि तत्कालिन नायब तहसिलदार, गेवराई, जि.बीड यांच्याविरुद्ध म.ना.से (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ व नियम १२ अनुसार दिनांक १८/०६/२०१८ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये इंधनाच्या देयकांमध्ये सविस्तर तपशील नमूद न करता तसेच देयकाची कोणतीही शहानिशा न करता देयक मंजूर केल्याचा दोषारोप देखील ठेवण्यात आला आहे. दरम्यानच्या कालावधीत तत्कालिन नायब तहसिलदार, गेवराई यांनी दिनांक ०३/०३/२०१८ रोजी सदर प्रकरणामध्ये ते दोषी नसल्याबाबतचे निवेदन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केले असल्याचे निदर्शनास येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदलापूर (ता.कराड, जि.सातारा) हद्दीतील दगडखाणी बंद करण्याबाबत

**(८) * ४१३९० श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदलापूर (ता.कराड, जि.सातारा) येथील नविन गावठाण वसाहतीच्या हद्दीत भूसुरुंगामुळे स्थानिक रहिवाश्यांच्या घरांना व शासकीय क्रीडा संकुलाच्या इमारतीला तडे गेल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदलापूर हद्दीतील दगडखाणी बंद करण्याबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व ग्रामसभेत ठराव करून तसेच वारंवार लेखी निवेदने देऊन देखील शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे नांदलापूर, ता.कराड, जि.सातारा येथील गट क्र. ४१०/१ अ मध्ये असलेल्या घरांपैकी १३ घरांच्या भिंतीच्या प्लॉस्टरला तडे गेल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे. मात्र शासकीय क्रीडा संकुलाच्या इमारतीला तडे गेल्याची बाब निदर्शनास आली नाही.

नांदलापूर हद्दीतील दगडखाणी बंद करण्याबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व ग्रामसभेत ठराव करुन तसेच तक्रार अर्ज सादर केले आहेत.

मौजे नांदलापूर, ता.कराड येथील गट नं. ४१०/२ ब या शासकीय जमिनीवर ७ खाणपट्टाधारकांना ५ वर्षाकरीता सन २०२१ पर्यंत खाणपट्टे मंजूर करण्यात आले आहेत. तथापि, गट नं. ४१०/२ ब मधील ७ खाणपट्टाधारकांपैकी नक्की कोणत्या खाणपट्टयातील भूसुरुंगामुळे घरांना तडे गेले आहेत, याबाबत उपविभागीय अधिकारी-कराड, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा, जिल्हा खनिकर्म अधिकारी, सातारा व

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे संबंधित अधिकारी यांचेमार्फत संयुक्तरित्या चौकशी करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर खाणपट्ट्यातून भुसुरुंगाद्वारे होत असलेले दगड उत्खनन स्थगित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग-रेवस (ता.अलिबाग, जि.रायगड) मार्गावरील सारळ पूलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(९) * ४२०६१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग-रेवस (ता.अलिबाग, जि.रायगड) मार्गावर असलेला सारळ पूल नादुरुस्त असल्यामुळे वाहतूकीस धोकादायक झाला असून सदर पूलावरून प्रवाशी वाहनांची सतत वाहतूक होत असल्याने अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पूलाचा स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही. प्रश्नांकित पुलाचे लोखंड खारट हवेमुळे काही प्रमाणात गंजलेले आहे व कॉक्रिट काही प्रमाणात निखळले आहे.
(२) सदर पुलाच्या ठिकाणी नवीन पूल मंजूर असून ठेकेदारी निश्चित करण्यात आली होती. तथापि, कंत्राटदाराने विविध कारणे पुढे केल्याने पुलाचे काम अद्यापपर्यंत सुरु केलेले नाही. यास्तव कंत्राटदाराकडून सदरचे काम काढून घेऊन निविदा रद्द करुन नवीन कंत्राटाची निश्चिती करुन पुलाचे काम पावसाळयांनतर सुरु करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील स्वास्तिक मिलने भुखंडाच्या विक्रीची अनर्जित रक्कम थकविल्याबाबत

**(१०) * ४१८२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील स्वास्तिक मिलने कर्मचाऱ्यांच्या वसाहतीकरीता शासनाकडून भूखंड मिळविला असून काही कारणामुळे स्वास्तिक मिलला वसाहतीचे बांधकाम करता आले नसल्यामुळे सदर मिलने शासनाच्या परवानगीच्या भूखंडाचे ५६ भाग करुन ते निरनिराळया गृहनिर्माण संस्थाना विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या करारानुसार स्वास्तिक मिलने विक्री किंमतीच्या ५० टक्के रक्कम अनर्जित म्हणून शासनाकडे जमा करणे आवश्यक होते, परंतु २० वर्षानंतरही उक्त रक्कम स्वास्तिक मिलने शासनाकडे जमा केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) खरे आहे.

(२) स्वास्तिक मिलकडून ज्या व्यक्ती/संस्था यांनी भूखंड खरेदी केला असेल त्या व्यक्ती/संस्था यांना या खरेदी केलेल्या भुखंडाची पुनर्विक्री करावयाची असल्यास शासनाची परवानगी घेणे व अनर्जित उत्पनाची रक्कम शासन जमा करणे आवश्यक असतांना त्यातील काही व्यक्ती/संस्था यांनी अशी पुर्वपरवानगी घेतली नसल्याचे व अनर्जित उत्पनातील शासनाचा हिस्सा शासनजमा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) या शर्तभंग प्रकरणी सर्व संबंधित भूखंड धारकांना जिल्हाधिकारी यांनी दिनांक २२/०६/२०१८ रोजी सुनावणी दिली. सदर सुनावणीचे वेळी संबंधित भूखंड धारकांनी सादर केलेल्या लेखी निवेदन/कागदपत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी-कल्याण-शिळ रस्त्याकरीता भूसंपादन झालेल्या प्रकल्प बाधितांना मोबदला देण्याबाबत

**(११) * ४१४९७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-कल्याण-शिळ रस्त्याच्या सहापदरीकरणासाठी काटई आणि निळजे (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील प्रकल्प बाधितांना भूसंपादनाची नोटीस पाठवून रस्त्याच्या जागेची मोजणी करण्यासाठी दिनांक १५ व १६ मे, २०१८ रोजी असता स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे सदर जागेची मोजणी होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९९ मध्ये याच रस्त्याचे चौपदरीकरण झाले असून, तेव्हापासून प्रकल्प बाधितांना मोबदला न देता एफ.एस.आय. वाढवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र त्याचा लाभ प्रकल्प बाधितांना मिळाला नसल्याने या कामास स्थानिकांचा विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री ठाणे जिल्हा यांच्यासोबत स्थानिक नागरिकांची अनुक्रमे दिनांक १० व २० एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्प बाधितांच्या मोबदल्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्प बाधितांना मोबदला देण्याबाबत एम.एम.आर.डी.ए., एम.एस.आर.डी.सी. व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासन या सर्व यंत्रणा आपल्या प्रशासनाची जबाबदारी नसल्याचे सांगून त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन १९९९ मधील रस्ता रुंदीकरणातील बाधितांना मोबदला देण्याबाबत व सध्याच्या सहापदरीकरणातील बाधितांना ग्रामस्थांच्या मागणीनुसार बाजारभावाच्या पाचपट रोख स्वरुपात मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) भिवंडी-कल्याण-शिळ रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सन १९९५-९६ च्या सुमारास हाती घेतले होते. सदर प्रकल्पामधील बाधित जमीन धारकांना बाधित जमिनीच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात मोबदला देण्यात येत असल्याबाबतचे पत्र महानगरपालिकेने दिले आहे. तसेच यासंबंधी दिनांक १०/०४/२०१८ रोजीच्या घेतलेल्या बैठकीत संबंधित शासकीय यंत्रणेस निर्देश दिलेले आहेत.
(३) दिनांक १०/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत संयुक्त मोजणी व मोबदला ठरविण्याबाबत आवश्यक त्या सूचना संबंधित प्रांत अधिकारी व उपअधीक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांना दिलेले आहेत.
(४) दिनांक १०/०४/२०१८ रोजीच्या बैठकीत संबंधित शासकीय यंत्रणांना मोबदल्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) सन १९९९ मधील रस्ता रुंदीकरणातील बाधितांना मोबदला देण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिनांक १०/०४/२०१८ रोजीच्या बैठकीत संबंधित शासकीय यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

सध्याच्या सहापदरीकरणाच्या भूसंपादनाबाबत प्रचलित भूसंपादन कायदा व थेट वाटाघाटीच्या शासन निर्णयाव्दारे कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बणोरी ते खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील देवणा नदीवरील पूलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(१२) * ४२७१४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बणोरी ते खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील देवणा नदीवरील पूलाच्या बांधकामास शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर पुलाच्या बांधकामाचे सन २०१६ मध्ये मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे हस्ते उद्घाटन करुनही पुलाचे बांधकाम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू पूलाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे, आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, पूलाच्या दोन बाजूच्या जोड रस्त्यांचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुलांचे काम पूर्ण करुन पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) पूलाचे खेड व खारी बाजुकडील दोन अँबटमेंट, बॉक्स रिटर्न, पीअर क्र. १,२,३ व १ गर्डर स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. स्वीकृत निविदेप्रमाणे काम जुलै, २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सद्य:स्थितीत सदर कामासाठी रुपये ४९.०० लक्ष इतका खर्च झाला आहे.
(३) होय, खरे आहे.

प्रश्नांकित पूलाच्या खेड व खारी बाजूकडील जोडरस्त्यासाठी आवश्यक खाजगी जमिनीचे भूसंपादन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

संबंधित जमीन मालकांनी जोडरस्त्याचे काम करण्यास हरकत घेतल्याने, भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन जोडरस्त्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी महाविद्यालये बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१३) * ४२९०४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ५७ कृषी महाविद्यालये बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून तशी शिफारस कृषी विभागाकडून मा.राज्यपाल महोदयांना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंद करण्यात येणाऱ्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) राज्यातील १५६ कायमस्वरुपी विनाअनुदानित खाजगी कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांची तपासणी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याकरीता डॉ.एस.एन. पुरी, माजी कुलगुरु, मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीने मागील वर्षी “ड” वर्गातील १८ महाविद्यालयांची तपासणी करुन ज्या महाविद्यालयांना दोनदा “ड” दर्जा प्राप्त झालेला आहे अशा

६ महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया व ४ महाविद्यालयांच्या प्रत्येकी एका तुकडीची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याबाबतची शिफारस केली होती. त्या शिफारशीस अनुसरुन संबंधित कृषी विद्यापीठांनी घेतलेल्या निर्णयानुसार या महाविद्यालयांची/तुकड्यांची सन २०१७-१८ ची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

या प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आलेल्या महाविद्यालयांच्या संबंधित संस्थांनी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे विविध रिट याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उक्त महाविद्यालयांमध्ये सन २०१७-१८ ची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. तसेच मा.उच्च न्यायालयाने या महाविद्यालयांना योग्य ते अभिवेदन (representation) अधिकृत यंत्रणा तसेच विद्यापीठांकडे मांडण्याची संधी देवून त्याद्वारे त्यांनी त्यांच्याकडे कोणतीही कमतरता/त्रुटी नसल्याचे तसेच सर्व पुर्तता केल्याचे सिध्द करुन दाखवावे असे आदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे कायदा १९८३ मधील तरतुदीनुसार महाविद्यालयांची तपासणी करणे, संलग्नता काढून घेणे इ. अधिकार कृषी विद्यापीठांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे विद्यापीठाने आवश्यक ती कार्यवाही करुन अंतिम निर्णय मा.उच्च न्यायालयापुढे मांडण्याबाबत संबंधित कृषी विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(१४) * ४३१३२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी वस्तीमध्ये माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान बॉटूलिझमच्या विषबाधेने २५ जनावरांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत जनावरांचे पंचनामे करुन भरपाई मिळावी अशी मागणी आदिवासी बांधवानी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मौजे कोठारे, चिल्लारवाडी व लाखेवाडी आदिवासी वस्तीमध्ये माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये १४ जनावरांची मर्तुक झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी सांगितलेल्या लक्षणांवरुन बॉटुलिझम सदृष्य विषबाधेने जनावरांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक निदान करण्यात आले. तथापि, शवविच्छेदनासाठी मृत जनावरे उपलब्ध होवू शकली नाहीत.
(२) पशुसंवर्धन विभागास निवेदन प्राप्त झालेले नाही. बॉटुलिझम सदृष्य रोगाने जनावरे मृत पावणे ही बाब नैसर्गिक आपत्तीत मोडत नसल्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना मदत देय होत नाही.
(३) व (४) दिनांक २४/०३/२०१८ पासून सदर परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता मौजे लाखेवाडी येथे नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. मौजे कोठारे, चिल्लारवाडी व लाखेवाडी (ता.शहापूर) येथील आजारी जनावरांवर माहे फेब्रुवारी व मार्च, २०१८ मध्ये आवश्यक ते उपचार केलेले असून, उपचाराअंती ही जनावरे चांगली झालेली आहेत.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसेस कुर्ला नेहरुनगर येथे वापराविना पडून असल्याबाबत

**(१५) * ४३३५६ श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अग्निशमन यंत्रणेअभावी राज्य परिवहन महामंडळाच्या कंत्राटी २५ शिवशाही बसेस कुर्ला नेहरुनगर येथे वापराविना पडून असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही. परिवहन कार्यालयात नोंदणी न झाल्याने सदर २१ शिवशाही बसेस कुर्ला स्थानकात उभ्या होत्या.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.औरंगाबाद) येथील शेतजमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१६) * ४३६६० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरालगत असलेल्या बाळापूर येथील शेतजमिनीची औरंगाबाद येथील नगर रचना विभागाने चुकीची नोंद घेवून चुकीचे मुल्यांकन (रेडीरेकनर) केल्याने सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना कमी मोबदला दिल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चूकीची नोंद झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी मान्य केले असूनही संबंधित कागदपत्रामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१६ मध्ये अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वार्षिक मुल्यदर तक्ते २०१७-१८ मध्ये दुरूस्ती करण्यात आलेली आहे. अर्जदाराने दिनांक १०/०१/२०१८ च्या अर्जान्वये सन २०१३, २०१४ व २०१५ वार्षिक मुल्यदर तक्त्यांमध्येही दुरूस्ती करण्याबाबत विनंती केली आहे. परंतु मागील वर्षाचे

वार्षिक मूल्यदर तक्ते यामध्ये दुरूस्ती किंवा बदल करण्याची तरतूद व अधिकार नसल्याने नगर रचना कार्यालयाच्या स्तरावरून कार्यवाही करणे शक्य नसल्याचे दिनांक ०७/०३/२०१८ च्या पत्रान्वये सक्षम प्राधिकारी यांना कळविले आहे. भूधारक राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे कलम ३ जी (५) नुसार लवादाकडे दाद मागू शकतात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(१७) * ४३७९९ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील ६८ वर्षीय शेतकऱ्याने शेतमालाला हमीभाव न मिळाल्याने व कर्जमाफी न झाल्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून स्वत:ला पेटवून घेऊन आत्महत्या केल्याचे दिनांक ६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिडीत शेतकऱ्याच्या कुटुंबियाला कर्जमाफी व मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
अशा प्रकरणाची नोंद पोलीस ठाणे, अर्धापूर, जि.नांदेड येथे झाल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ तोट्यात असल्याबाबत

**(१८) * ४३८२१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ पर्यंत नफ्यामध्ये चालणारे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ माहे डिसेंबर, २०१६ मध्ये तोट्यात असल्याची बाब संचालक मंडळाच्या बैठकीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संचालक मंडळाने दखल न घेतल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे, उपरोक्त दुर्लक्षामुळे राज्यातील सुमारे १५० लघुउद्योग (स्मॉल स्केल इंडस्ट्रीज) बंद पडले आहेत, त्यामुळे १० हजार कामगार बेरोजगार झाले असून ५० हजार लोकांवर उपासमारीची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या नुकसानीस संचालक मंडळास जबाबदार धरुन तत्कालिन संचालक मंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये स्थूल व निव्वळ नफ्यात होते. सन २०१७-१८ मध्ये महामंडळ स्थूल नफ्यात आहे पण सुमारे १३ कोटी इतका निव्वळ तोटा होण्याची शक्यता आहे. महामंडळाचे वर्ष २०१७-१८ च्या वार्षिक लेख्याचे महालेखाकार यांचेकडून लेखा परिक्षण व्हायचे आहे.

(२) याबाबत महामंडळाचे संचालक मंडळ सतत आढावा घेत असून, आढावा अभावी महामंडळाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, महामंडळ मिश्रण खत, पशु खाद्य व नोगा ब्रांड प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थांचे स्वतः उत्पादक असल्यामुळे इतर लघु उद्योग बंद पडणे व कामगार बेरोजगार होणेचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) महामंडळाचे प्रमुख उत्पादन मिश्रण खत आहे, खत विक्रीची संगणकीकृत नवीन प्रणालीमुळे रासायनिक खत विक्रेते मिश्रण खताकरीता कच्चा माल पुरविण्यास कमी उत्सुक झाले आहेत. तसेच, त्याची विक्रीपासून महामंडळाला मिळणारा नफा कमी करुन विक्री करावी लागत आहे. महामंडळ शेती सयंत्रांची विक्रीकरीता एकाधिकार युक्त एजेंसी म्हणून होती. शासनामार्फत शेतकऱ्यांचे हिताचेदृष्टीने दिनांक १९/०४/२०१७ पासून कृषी अभियांत्रिकेच्या साहित्य वाटपाच्या योजनेकरीता थेट लाभ हस्तांतरण/डी.बी.टी. (Direct Benefit Transfer) हे धोरण राबविण्यात येत आहे. थेट लाभ हस्तांतरण/ डी.बी.टी. (Direct Benefit Transfer) ची उपयुक्तता लक्षात घेता, महामंडळ खुल्या बाज़ारात स्पर्धेत टिकून व्यवसाय करणेकरीता त्यांचे व्यवसाय प्रणालीमध्ये बदल करीत आहे. या व्यतिरिक्त, कृषी मालाची मुल्य वृद्धी, विपणन व निर्यात, उच्च तंत्रज्ञान वर आधारित शेती व सुक्ष्म सिंचन संच संबंधी तांत्रिक सेवा देणे इत्यादी नवीन उपक्रम हाती घेवून महामंडळाचा व्यवसाय वाढविणेचा निर्णयही महामंडळाचे संचालक मंडळांनी घेतलेला आहे. व्यवस्थापकिय संचालक त्याप्रमाणे कार्यवाही करीत असल्याने, संचालक मंडळावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि.जळगांव) येथे अवैध प्रवाशी वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१९) * ४३८३६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) येथे अवैध प्रवाशी वाहतुक मोठ्या प्रमाणात चालू असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतरही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध प्रवाशी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई न करणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच अवैध प्रवाशी वाहतुक करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जळगांव जिल्ह्यातील अवैध वाहतूकीसंदर्भात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यात येत असून दिनांक ०१/०४/२०१७ ते दिनांक २९/०६/२०१८ या कालावधीत एकूण ८२२० वाहने तपासण्यात आली असता यामध्ये १५४४ वाहने दोषी आढळून आली आहेत. सदर वाहनधारकांकडून तडजोड शुल्क, न्यायालयीन दंड व करापोटी रुपये ४६,५१,७१३ वसुल करण्यात आले असून ६३७ वाहनांची नोंदणी व ३४० वाहनांचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) पंचायत समितीच्या कृषी विभागाला भात बियाणांचा पुरवठा करण्याबाबत

**(२०) * ४३८८३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) येथील १४ हेक्टर क्षेत्रात भातांच्या वाणाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जात असून वाडा पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे सध्या कोणतेच भात बियाणे शिल्लक नसल्याने तेथील शेतकऱ्यांनी तसेच पंचायत समिती, वाडा यांनी भात बियाणांची मागणी शासनाच्या कृषी विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वाडा पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे भात बियाणांचा तुटवडा असल्याने भात बियाणांचा पुरवठा करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, सचिव (कृषी) यांच्याकडे दिनांक ११ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास समर्थन संस्थेने लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाडा पंचायत समितीच्या कृषी विभागाला भात बियाणांचा पुरवठा करण्याबाबत तसेच, उक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) वाडा (जिल्हा पालघर) येथील भात पिकाखालील एकूण क्षेत्र १३,५७० हेक्टर एवढे आहे. वाडा तालुक्यात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), अकोला यांच्याकडून विविध भात वाणांचे एकूण ११३६ क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यापैकी ७७२ क्विंटल भात बियाणांची विक्री झालेली असून ३६४ क्विंटल बियाणे शिल्लक आहे.

जिल्हा परिषद पालघर यांनी पंचायत समिती, वाडाकरीता एकूण ७२५ क्विंटल धान बियाणांची मागणी महाबीजकडे केलेली होती. सदर मागणी ही दिनांक १७ मे, २०१८ रोजी उशिराने प्राप्त झाली. महाबीजने त्यांच्याकडील उपलब्ध एकूण ३६९ क्विंटल बियाणांचा पुरवठा पंचायत समितीला केलेला आहे.
(२) होय.
(३) खरीप हंगाम २०१८-१९ मध्ये वाडा तालुक्यातील अधिकृत बियाणे विक्री केंद्रात एकूण ४२४८ क्विंटल एवढे भात बियाणे उपलब्ध झाले असून, त्यापैकी ३९२३ क्विंटल बियाणांची प्रत्यक्ष विक्री झालेली आहे. अद्यापही वाडा तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांकडे ३२५ क्विंटल भात बियाणे शिल्लक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी (जि.नागपूर) येथे बसस्थानक निर्माण करण्याबाबत

**(२१) * ४३९२९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर परिसरातील ३० ते ३२ गावे बुटीबोरी औद्योगिक वसाहतीला जोडली असल्याने नागपूर-हैद्राबाद आणि नागपूर-वर्धा-यवतमाळ-नांदेड या मार्गावर बसस्थानक नसल्याने प्रवाशांना जीव धोक्यात घालून वाहनाची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे मे, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुटीबोरी येथे औद्योगिक वसाहत, महाविद्यालय, वैद्यकीय सुविधा, बँका, विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयामुळे मोठ्या प्रमाणात कर्मचारी, विद्यार्थी व नागरीकांची ये-जा सुरु असल्यामुळे बुटीबोरी येथे बसस्थानक निर्मिती करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) बुटीबोरी विभाग नागपूर येथे प्रवाशी निवारा असून रा.प. महामंडळाने बुटीबोरी येथे बसस्थानक बांधण्यासाठी ४० आर एवढी जागा एम.आय.डी.सी.कडून सन २०१६ मध्ये ताब्यात घेतली आहे. सदर जागेत बसस्थानक बांधण्याच्या कामाचा कार्यादेश देण्यात आला असून एम.आय.डी.सी. यांच्याकडून बसस्थानक बांधकामासाठी दिनांक २२/०५/२०१८ रोजी बांधकाम परवानगी मिळाली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकरी खत खरेदीपासून वंचित असल्याबाबत

**(२२) * ४३६१४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे तीन लाख खातेदार शेतकरी असून खत खरेदी करण्यासाठी त्यांना आधारकार्ड सक्तीचे करण्यात आल्यामुळे शेतकरी हक्काच्या खतापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना करण्यात आलेली आधार कार्डची सक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे ३ लाख खातेदार शेतकरी आहेत. सदर शेतकऱ्यांना पॉस मशीनद्वारे खत विक्री केली जाते. त्याकरीता खत खरेदी करताना शेतकऱ्यांकडे आधारकार्ड अथवा त्याची छायाप्रत मागणी केली जाते. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार खत पुरवठा करण्यात आलेला असून जिल्ह्यात कोणत्याही शेतकऱ्याची खत पुरवठ्याबाबत तक्रार प्राप्त नाही, कोणीही शेतकरी खतापासून वंचित राहिलेला नाही.
(२) केंद्र शासनाच्या डिबीटी (डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर) धोरणानुसार पॉस (पॉईंट ऑफ सेल) मशिनच्या माध्यमातून खत विक्री करण्यात येत आहे. सदर धोरणानुसार खतावरील अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) * ४१९६१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची ३१ पदे रिक्त असल्यामुळे कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहचत नसल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मंजूर असलेल्या ७७ पदांपैकी ४९ पदे भरलेली असून २८ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमध्ये शेतकऱ्यांशी संबंधित मंडळ कृषी अधिकारी २, कृषी पर्यवेक्षक १ पद व कृषी सहाय्यकांची १६ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या पदांचा अतिरक्त कार्यभार इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपवून मंगळवेढा तालुक्यात कृषी विभागाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(२) महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील २९९ पदांचे मागणीपत्र कृषी सेवा परीक्षा-२०१८ साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. तसेच कृषी सेवा परीक्षा-२०१७ मधील निवड झालेल्या ७९ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक व महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

कृषी सेवकांची विविध संवर्गातील ९०८ रिक्त पदे भरण्यासाठी महापरीक्षा कक्ष, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान कक्ष) यांचेकडून परीक्षा घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये पुणे संभागातील ९९ रिक्त पदांचा समावेश आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र. ६२७/२०१८ दाखल केलेला असून सदर अर्जावर दिनांक ०८/०५/२०१८ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा.न्यायाधिकरणाने पुढील सुनावणीपर्यंत संपूर्ण भरती प्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २५/०७/२०१८ रोजी आहे. मा.न्यायाधिकरणाने स्थगिती उठविल्यानंतर प्रस्तुत रिक्त पदे तात्काळ भरण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२४) * ४३८६४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाच्या बांधकामाचे कंत्राट सन २०११ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने परराज्यातील ठेकेदाराला देवून सदर बांधकाम अपूर्ण ठेवल्यामुळे या कामाच्या वाढीव निधीची मागणी करत हे काम दुसऱ्यांदा म्हणजे सन २०१४ मध्ये ठेकेदाराला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाला दोन वर्षे होऊनही इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारत बांधकामासाठी शासनाकडून निधी वेळेत मिळत नसल्याकारणाने इमारतीचे बांधकाम प्रलंबित राहिल्याचे माहे जून, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. (परराज्यातील ठेकेदाराला काम देण्यात आलेले नाही.)
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) सदर वसतिगृहासाठी आवश्यक जागा उपलब्ध न झाल्याने तसेच त्यानंतर बांधकामाच्या प्रगतीनुसार दरवर्षी अपेक्षित निधी उपलब्ध न झाल्यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. जागेच्या बदलामुळे सदर इमारतीचे संकल्पनामध्ये बदल झाल्याने कामाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सदर वाढ झालेल्या रुपये ६७१.०६ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार उपलब्ध निधीच्या अधीन राहून सदरचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांचे प्रलंबित विमा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(२५) * ४२५१८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या दुर्घटना व त्यांना आधार म्हणून सन २०१६ मध्ये गोपीनाथ मुंडे किसान दुर्घटना योजना सुरु करण्यात येवून सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये ६१ प्रस्ताव विमा कंपनीकडे पाठविण्यात येवूनही त्यापैकी केवळ १८ प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करुनही उर्वरीत प्रस्ताव प्रलंबित/नांमजूर राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे प्रलंबित विमा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) भंडारा जिल्ह्यात सन २०१६-१७ या वर्षात एकूण ५८ विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ४६ प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी २० प्रस्ताव मंजूर झाले असून ९ प्रस्ताव योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्याने नामंजूर झालेले आहेत. १७ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत. सन २०१७-१८ या वर्षामध्ये, भंडारा जिल्ह्यातून आतापर्यंत फक्त एकच प्रस्ताव प्राप्त झालेला असून, तो विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

(२) कागदपत्रांची छाननी व पूर्ततेच्या कारणास्तव विमा प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित विमा प्रस्ताव अंतिमत: निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई देणेबाबत

**(२६) * ४१६२७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९९७३ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील उमापूर येथील १५६२, मादळमोही येथील ११६ (ता.गेवराई), नाळवंडी, पिंपळनेर (ता.बीड) धारूर व केज येथील शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेंतर्गत विमा हप्ता रक्कम भरणा करुनही त्यांना पीक विमा नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये संबंधित बँकांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदायगी त्वरित करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम केव्हा मिळणार आहे, सन २०१४ च्या दुष्काळी अनुदान व पीक विमा वाटपाबाबत बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चाचणी लेखा परीक्षण

करण्याचे निर्देश दिल्याप्रकरणी सदर लेखा परीक्षण झाले आहे काय, चाचणी लेखा परीक्षण मधील कोणते निष्कर्ष शासनाला प्राप्त झाले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान व पीक विमा वाटपाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा उमापूर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड, शाखा नाळवंडी, पिंपळनेर व मादळमोही या बँकांच्या चुकांमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने सदर बँकांना पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई त्वरीत अदा करणेबाबत लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बीड या बँकेचे चाचणी लेखापरीक्षण करण्याकरीता विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या दिनांक २३/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतु अद्यापही सदर बँकेचा अद्यापही चाचणी लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा उमापूर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड शाखा नाळवंडी व पिंपळनेर तसेच जिल्हा मध्यवती सहकारी बँक बीड शाखा मादळमोही या बँकांना पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई त्वरीत अदा करणेबाबत दिनांक ३०/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच, पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई त्वरीत अदा करणेबाबत उपरोक्त बँकांना आदेशीत करणेबाबत सहसचिव (पत), कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांना दिनांक ०५/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

केंद्र शासनस्तरावर एच.डी.एफ. सीइंर्गो इंशुरन्स कंपनी व स्टेट बँक ऑफ इंडिया, उमापूर यांचे बरोबर उपरोक्त प्रकरणी चर्चा झाली व त्यानुसार सहसचिव (पत), कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी दिनांक ११/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर यांनी पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई त्वरीत अदा करणेबाबत कळविलेले आहे. सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने आयुक्त कृषी यांनी दिनांक २५ मे, २०१८ च्या पत्रान्वये नुकसान भरपाई त्वरीत अदा करण्याची सूचना दिलेली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा उमापूर, यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयात दिवाणी दावा दाखल करणेबाबत विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावर विधीज्ञांचे सल्ल्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दूध भूकटी प्रकल्पधारकांना अनुदान देण्याबाबत

**(२७) * ४२८४६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बाजारपेठेत व देशात दुध पावडरला मागणी नसल्याने सहा हजार कोटी रुपयांची दुध पावडर पडून असल्याने दुध पावडर निर्यातीला प्रतिकिलो रुपये २५ अनुदान देण्याची मागणी दुध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाने शासनाकडे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार निर्धारित केलेला दर दुध उत्पादकांना देण्यासाठी दुध भूकटी निर्यात होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) व (२) दुध पावडर निर्यातीला प्रतिकिलो रुपये २५ अनुदान देण्याची मागणी दुध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाने शासनाकडे केली असल्याचे शासनास आढळून आलेले नाही.

मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भूकटीच्या कोसळलेल्या दराच्या पार्श्वभूमीवर दुध भूकटीच्या निर्यातीस प्रोत्साहन मिळावे त्यासाठी राज्यातील दूध भूकटी प्रकल्प धारकांना प्रतिकिलो रुपये ५० एवढे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा दिनांक १०/०७/२०१८ रोजी विधानसभेच्या सभागृहात शासनाकडून करण्यात आली आहे. सदर अनुदान पुढील दोन महिन्यात निर्यात केलेल्या दुध भूकटीसाठी अनुज्ञेय राहणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दादर (ता.पेण, जि.रायगड) गावातील दुष्काळग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(२८) * ४३५९६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील दादर गावच्या सभोवती असणारी बांध बंदिस्ती बंधारा सन १९८९ च्या महापूरात वाहून गेल्याने सुमारे १२ हजार हेक्टर जमिनीत समुद्राचे खारे पाणी शिरून शेतजमीन नापीक झाली असून गावातील घरे वाहून गेली तसेच मालमत्तेचेही नुकसान झाले असून सदर घटनेला २९ वर्षे झाली असून शासनाकडून दुष्काळग्रस्तांना कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतजमीन नापीक झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभदेखील मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दादर गावातील दुष्काळग्रस्तांना न्याय न मिळाल्यामुळे दिनांक २१ मे, २०१८ पासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दादर गाव दुष्काळग्रस्त जाहिर करून दुष्काळग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच महापूरात वाहून गेलेले बांध बंदिस्ती बंधारा बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्यात येते. त्यामध्ये समुद्राचे पाणी शिरुन शेत जमिनी नापीक झाली असल्यास, नापीक झालेल्या शेत जमिनीस मदत देण्याची तरतूद नाही.

(२) अशी बाब नाही.

(३) हे खरे आहे.

(४) मौजे दादर, ता.पेण, जि.रायगड ही खार भुमी योजना खाजगी असून सन १९८९ च्या महापुरात पूर्णत: बाधित झाली आहे. सदर योजना शासनाच्या ताब्यात घेणे प्रस्तावित असून, शासनाच्या ताब्यात घेण्यापूर्वी सदर योजना किनारा नियमन (CRZ) कायदा-२०११ मधून सूट घेणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी सदर योजनेस CRZ मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र किनारा नियमन प्राधिकरण (MCZMA), मुंबई यांच्याकडे ऑगस्ट, २०१७ मध्ये पाठविण्यात आला आहे.

दुष्काळ घोषित करण्यासाठी केंद्र शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ केंद्र शासनाने अंमलात आणली असून त्यामधील तरतूदीनुसार प्रस्तृत तालुक्यात सन २०१७ मध्ये दुष्काळ घोषित करता आलेले नाही. सदर संहितेतील निकषाची पूर्तता होत नसेल अशा तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित करता येत नाही.

मौजे दादर येथील नागरिकांना सुरक्षा योजनेचे लाभ मिळण्याबाबतच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून ३५६१ लोकसंख्येसाठी ७९३ अन्न सुरक्षा कार्डाचे वाटप करण्यात आले. शासन निर्णय, अन्न व नागरी पुरवठा विभाग, दिनांक २१ मे, २०१८ नुसार अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही पेण तहसिल कार्यालयाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खारेकुरण (ता.जि.पालघर) खाडीवर पूल बांधण्याबाबत

**(२९) * ४३८२८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेकुरण (ता.जि.पालघर) खाडीवर पूल व महागाव आगवण रस्त्याचे काम करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांचेकडे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ रोजी तसेच मा.ग्रामीण विकास राज्यमंत्री, भारत सरकार यांनी ९ जुलै, २०१३ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे व मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.रस्ते वाहतूक आणि महामार्ग, जहाज बांधणी मंत्री भारत सरकार यांना दिनांक १६ मे, २०१८ रोजी विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खारेकुरण खाडीवर पूल व महागाव आगवण रस्त्याचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ व दिनांक ९ जुलै, २०१३ ची निवेदने उपलब्ध नाहीत. तथापि, दिनांक १६ मे, २०१८ च्या निवेदनाद्वारे प्रश्नाधीन पूल व रस्त्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे. तथापि, महागाव आगवण रस्ता अस्तित्वात नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी बीडीडी चाळीच्या दुरूस्तीच्या कामात अपहार झाल्याबाबत

**(३०) * ४२७०४ श्री.प्रसाद लाड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य मुंबई सार्वजनिक बांधकाम उपविभागातील बीडीडी चाळीच्या दुरूस्तीच्या नावाखाली खोट्या निविदा काढून, खोटे कारारनामे करून वर्क ऑर्डर काढून, कामे न करताच २२ कोटीच्या देयकाचे धनादेश वटविण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिका आणि देयकांच्या सत्यप्रतीवरून माहे फेब्रुवारी-मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्र्याकडे सविस्तर तक्रार करून सदर अपहारास जबाबदार असलेल्या संबंधितांविरोधात कारवाई करण्याची मागणी केलेली असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दोषीविरोधात कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २२ कोटी रूपयांच्या अपहार प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांविरोधात कारवाई करण्यास विलंब होण्याची कारणे काय असून दोषींविरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) वरळी, मुंबई येथील बीडीडी चाळीच्या कामात गैरव्यवहार प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीची शासनाने गंभीर दखल घेवून या सर्व तक्रारीची अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले. त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार वरळी, मुंबई येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास कामात मुदत उलटून देखील काम अपूर्ण असणे, कामाची विभागणी करणे, विभागणीस सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी न घेणे, करारनाम्यातील तरतूदीनुसार कंत्राटदारास बांधकाम साहित्याच्या चाचणीपोटी रक्कम अदा केली असणे, परंतु दक्षता

पथकास चाचणी अहवाल उपलब्ध करुन न देणे अशा प्रकारच्या प्रशासकीय अनियमितता झाल्या आहेत. सदर अनियमिततेस तत्कालिन कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंता हे संयुक्तरित्या जबाबदार असल्याने त्यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

-----------------

## मुंबई-पुणे बुलेट ट्रेन प्रकल्प उभारण्याबाबत

**(३१) * ४२९०७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे बुलेट ट्रेन प्रकल्प उभारण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे बुलेट ट्रेन प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, सदर प्रकल्पाचे काम केव्हापासून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मुंबई-पुणे बुलेट ट्रेनचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील मच्छिमार संस्थांच्या कर्ज वाटपात अपहार झाल्याबाबत

**(३२) * ४३१४२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील दर्यासागर व त्रिशला मच्छिमार संस्थांना केलेल्या लाखो रुपयांच्या कर्ज पुरवठा योजनेत अपहार झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रिशला मच्छिमार संस्थेतील ज्या चेअरमनच्या नावे रुपये २९ लाखांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे ते चेअरमन सौदी अरेबियात नोकरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच दर्यासागर संस्थेमधील रुपये ६० लाख असा एकूण रुपये ९० लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित विभागाचे अधिकारी व मच्छिमार संस्थावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३) दर्यासागर मच्छिमार संस्थेचे चेअरमन श्री पवन भालचंद्र नाखवा यांनी संस्थेला अदा करण्यात आलेल्या रकमांची अफरातफर केल्यामुळे त्यांच्याविरोधात दिनांक २८/०४/२०१८ रोजी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा (एफआयआर नं. ००८६) दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

त्रिशाला मच्छिमार संस्थेला अदा करण्यात आलेल्या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे संस्थेविरुद्ध सक्तीच्या मार्गाने भागभांडवल वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवासपास देण्याबाबत

**(३३) * ४३३५९ श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २६३४० ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना बारमाही मोफत पास देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंध्रप्रदेश, गुजरात व कर्नाटक या राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने काही निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पत्रकारांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये मोफत प्रवास देण्यात येत असल्याने राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बारमाही मोफत पास न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बारमाही मोफत प्रवासपास देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या पती/पत्नीस जुलै ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये दोन महिन्याच्या मुदतीचा मोफत पास रा.प.म.च्या दिनांक १३/०२/१९९६ च्या आदेशान्वये दिला जातो. तसेच सेवेत असताना/सेवानिवृत्तीनंतर मरण पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /अधिकाऱ्यांच्या पत्नीस/पतीस जुलै ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये एक महिन्याचा मुदतीचा मोफत पास रा.प. च्या दिनांक २६/०५/२००९ परिपत्रकान्वये दिला जातो.

(३) व (४) सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेने रुपये ५०० भरुन १२ महिने मोफत पास देण्याबाबत केलेली मागणी रा.प. संचालक मंडळाने दिनांक १०/०८/२००९ च्या ठरावान्वये अमान्य केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्‌योग विकास महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) * ४३८२२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र कृषी उद्‌योग विकास महामंडळ विभागीय कार्यालय, नाशिक येथे रुपये १.५० कोटीचा आर्थिक गैरव्यवहार सन २०१२ ते माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आला असून यासंदर्भात अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिनांक २९/०८/२०१७ ते दिनांक ३०/१०/२०१७ या कालावधीमध्ये महामंडळाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नावे रुपये २३.७१ लाखाचा भरणा करुन महामंडळाच्या खात्यावर जमा केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २३/११/२०१७ रोजी उपविभागीय कार्यालय, अहमदनगर येथील तीन अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध रुपये ६६.०३ लाख इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार दाखल झाली असून सदर तक्रारीत रुपये ४२.२९ लाख इतक्या रकमेची पुरवणी तक्रार दाखल करण्यात येणार होती, सदर तक्रार आजपर्यंत दाखल करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.भागवत लांबे यांच्या कार्यकाळामध्ये विभागीय कार्यालय, नाशिकची येणे बाकी रक्कम रुपये १५.०० कोटी आहे तसेच पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडील साठा फक्त रुपये १.५० कोटी रुपयाचा असतांना उर्वरित रुपये १३.५० कोटी रकमेचा अपहार श्री.बोरसे यांच्या सहकार्याने श्री.लांबे यांनी केला असून उपरोक्त प्रकरणातील तीनही आरोपी व्यवस्थापक श्री.भागवत लांबे हे दोषी असूनही त्यांना पाठीशी घालण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील** : (१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयांतर्गतच्या अहमदनगर उपविभागीय कार्यालयात रुपये १.२० कोटी रकमेचा आर्थिक गैरव्यवहार सन २०१२ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत झालेला आहे, हे खरे आहे.

सदर प्रकरणातील अपहारी अधिकाऱ्यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ ते १३ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये एकूण रुपये २३.७१ लाखाचा भरणा, महामंडळाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था खात्यावर, वेगवेगळया शेतकरी बचत गट व वैयक्तिक शेतकऱ्यांकडून अवैधरीतीने रोखीने रक्कम घेऊन केला असल्याचे दिसून आलेले आहे.

(२) दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी उपविभागीय कार्यालय, अहमदनगर येथील ३ अधिकारी/कर्मचारी श्री.आर.बी. होले, सहा. व्यवस्थापक (पणन), श्री.एम.एम. राजूरकर, सहा.व्यवस्थापक (पशुखाद्य) व श्री.आर.बी. कुलट, लिपीक यांच्याविरुध्द रुपये ६६.०४ लाख इतक्या रकमेचा अपहार केल्याचा गुन्हा नों.क्र. ५१०/२०१७ अन्वये कोतवाली पोलीस ठाणे, अहमदनगर येथे दाखल करण्यात आलेला आहे. सदरच्या मुळ तक्रारीतच रुपये ५४.९५ लाखाची पुरवणी तक्रार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी समाविष्ट करुन, सदर तक्रार ही एकूण रुपये १२०.९९ लाख इतक्या आर्थिक गैरव्यवहाराची आहे.

(३) विभागीय कार्यालय नाशिकच्या कृषी अभियांत्रिकी विभागाची दिनांक २८/०२/२०१८ रोजीची येणेबाकी रुपये १५ कोटी नसून प्रत्यक्षात रुपये ८.५६ कोटी इतकी आहे. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील पंचायत समित्या व तालुका कृषी अधिकारी कार्यालये यांच्याकडे एकूण रुपये १.५९ कोटी रुपयांची अवजारे साठ्यात शिल्लक असून रुपये ८.५६ कोटी येणे बाकी आहे.

तालुका कृषी अधिकारी व जिल्हा कृषी विकास अधिकाऱ्यांकडून सदर खरेदीचे साहित्य वाटप न झाल्याबाबत त्यांची व त्यांचे वरिष्ठ सनियंत्रक अधिकाऱ्याविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कृषी आयुक्ताकडून प्राप्त

करुन घेण्यात येत आहे. एकूण थकित येणेची रक्कम रुपये ८.५६ कोटीबाबत कृषी आयुक्तांचे चौकशी अहवाल प्राप्त व्हायचे आहे.
(४) सदर प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेवून आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ०७ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. वरील प्रश्न भाग २ मध्ये नमूद रुपये १२०.९९ लाख रक्कमेचा गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिनांक ०६/१२/२०१७ रोजी निलंबित करण्यात आलेले असून त्यांची विभागीय चौकशी चालू आहे. फौजदारी गुन्हयाचा तपास सुध्दा चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंत्रालय इमारतीच्या दुरूस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३५) * ४३६८३ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे जून, २०१२ मध्ये मंत्रालयाला आग लागल्यानंतर दुरुस्ती व आधुनिकीकरणाचे काम करताना पडलेला मलबा हटविण्याचे काम दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील झकेरिया बंदर येथील मारुती मजूर सहकारी संस्थेला देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकच काम अनेक मजूर संस्थाना देऊन तसेच न केलेल्या कामाची देयके अदा करुन गैरव्यवहार झाल्याप्रकरणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावून चौकशी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), व (४) मंत्रालय आवारातील डेब्रिज बाहेर काढणे व अन्य बाबींसंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी सुरु आहे.

-----------------

## जव्हार-गोरठण-सिल्व्हासा (जि.पालघर) रस्त्यांची कामे करण्याबाबत

**(३६) * ४२६४७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील जव्हार-गोरठण, आळ्याचीमेट, रातूना, सिल्व्हासा रस्त्याचे काम मागील तीन वर्षापासून संथगतीने सुरु असून जव्हार-सिल्व्हासा या वर्दळीच्या रस्त्याचे डांबरीकरण, मजबुतीकरण व रुंदीकरणाचे काम प्रलंबित राहिल्याने सदर रस्त्यांवर अपघात होऊन जिवीतहानी व वित्तहानी झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांच्या डांबरीकरण, मजबुतीकरण व रुंदीकरणाचे कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर काम फेब्रुवारी, २०१७ मध्ये सुरु करण्यात आले असून वृक्ष व सेवावाहिन्या हटविण्याकरीता वेळ लागल्याने काम विहित वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. सद्य:स्थितीत बी.एम.चे काम पूर्ण झाले असून रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरू आहे.

तथापि मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिवितहानी व वित्तहानी झाली नसल्याचे जव्हार पोलीस स्टेशन यांच्या अहवालावरुन दिसून येते
(२) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) व (४) काम मुदतीत पूर्ण न झाल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

## जुनोना ते पोभूर्णा (जि.चंद्रपूर) रस्त्याच्या कामाकरीता जादा रकमेची निविदा काढल्याबाबत

**(३७) * ४२५१३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुनोना ते पोभूर्णा (जि.चंद्रपूर) हा २८ कि.मी. रस्त्याच्या बांधकामांकरीता रुपये १० ते १२ कोटींची आवश्यकता असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर रस्त्याच्या बांधकामाकरीता रुपये १३१ कोटीची निविदा काढण्यात आल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर रस्त्याच्या सुधारणा व रूंदीकरणाच्या कामाकरीता हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत रुपये ११४.०० कोटी रकमेची निविदा काढण्यात आली होती. निविदा स्वीकृत करण्यात आली आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी याबाबतचा अहवाल मागितलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माकुणसार (ता.जि.पालघर) येथील खारभूमी बंधाऱ्याची दुरूस्ती/पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३८) * ४३७०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माकुणसार (ता.जि.पालघर) येथे २० वर्षांपूर्वी मायखोप जोडरस्त्यालगत बांधण्यात आलेला खारभूमीचा बंधारा फुटल्याने खाडीच्या भरतीचे पाणी शेतात घुसून सुमारे ६० एकर जमिनी नापीक झाल्या असून खाडीचे पाणी जमिनीत झिरपल्यामुळे परिसरातील विहीरी व कुपनलिकांमधील पाणी खारे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माकुणसार येथील बंधाऱ्याची दुरवस्था झाल्यामुळे सदरहू बंधाऱ्याची डागडूजी करण्यात यावी व पुनर्बांधणी करण्यात यावी म्हणून मागील ५ वर्षांपासून स्थानिक शेतकऱ्यांनी सातत्याने जिल्हाधिकारी, पालघर, कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास विभाग, कळवा यांना निवेदन पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू खारभूमी बंधाऱ्याची दुरूस्ती/पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१२ मध्ये सदर खारभूमी योजनेच्या सा.क्र. २० मी. वरील उघाडी नादुरूस्त झाल्याने व उघाडी लगतच्या बांधास खिंडार पडल्याने भरतीचे पाणी पुन:प्रापित क्षेत्रात पसरले होते व त्यामुळे शेतीचे ६० एकर (२४ हेक्टर) क्षेत्राचे नुकसान झाले होते व काही प्रमाणात विहिरी व

कुपनलिका मधील पाणी खारे झाले होते. परंतु जून, २०१६ मध्ये सदर काम पूर्ण करण्यात आले आहे व सद्य:स्थितीत योजना सुस्थितीत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत, विळंगी यांनी दिनांक २६/०७/२०१३ व ग्रामपंचायत, आगरवाडी यांनी दिनांक ४/०३/२०१५ रोजीच्या अर्जान्वये सहाय्यक अभियंता श्रेणी-१, खारभुमी विकास उपविभाग, पालघर यांचेकडे बंधाऱ्याची दुरवस्था झाल्यामुळे सदरहू बंधाऱ्याची डागडूजी करण्यात यावी व पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी केली होती व त्यानुसार सदर फुटलेल्या बंधाऱ्याच्या ठिकाणी सा.क्र. २० मीटर वर नविन उघाडी बांधण्यात आलेली आहे. उघाडीच्या दोन्ही बाजुकडील भरावाचे काम जून, २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत योजना सुस्थितीत आहे. ग्रामपंचायत विळंगी व ग्रामस्थ माकुणसार यांनी दिनांक १८/०१/२०१७ रोजी योजना सुस्थितीत झालेबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल वसूली बंद करण्याबाबत

**(३९) * ४२९०८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८६७ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल वसूली संदर्भात शासनाने नेमलेल्या सुमित मलिक समितीने २३ महिन्यांपूर्वी आपला अहवाल शासनास सादर केलेला असून त्यावर निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यावर निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त अहवालावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे व त्यावर निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) सुमित मलिक समितीचा अहवाल शासनास दिनांक २७/०४/२०१६ रोजी प्राप्त झाला असून, सद्य:स्थितीत या प्रकरणी मा.उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. ३८/२०१७ व त्यातील दिवाणी अर्ज क्र. २४/२०१८ या याचिका दाखल आहेत. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असून सुनावणी सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.